मूल्य ₹१५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ५ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • मे - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

अंक ५ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • मे २०१९

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर
राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३०
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -५५ ३४
- तेजस्विनी-८५ ३७
- पंख्याचा वापर ४२
- सकारात्मक जगण्यासाठी... ४३
- आपले जिल्हे - रायगड ४४
- पक्षीजगत ४७





## कथा


- नृग राजाची कथा ०५
- आज्ञापालन ०८
- आईच्या प्रेमाची किंमत १४
- साधु बोध २०
- अन्यायावर मात २१
- सिंहाला अद्दल घडली ३५
- खरा भक्त ४८








## कविता


- आईचे प्रेम १५
- सुट्टी लागली २३

# प्रेम द्यावे

एक गृहस्थ एका इमारतीत नवीनच राहायला आला. त्याच्या शेजारी राहणारी व्यक्ती अतिशय दुष्ट आणि भांडखोर होती. त्यामुळे शेजारी कोणीही जास्त काळ टिकत नसे.

पहिल्याच दिवशी शेजारच्या दुष्ट व्यक्तीने आपल्या घरातील कचरा टोपलीत भरुन त्या सज्जनाच्या दारापुढे नेऊन ठेवला आणि तो आपल्याशी केव्हा भांडायला येतो याची वाट पाहू लागला. ज्यावेळी सज्जन गृहस्थ सकाळी प्रसन्नचित्ताने कामावर जायला निघाला तेव्हा शेजाऱ्याने आपल्या दरवाजात ठेवलेला कचरा त्याला दिसला. त्याने तो कचरा कचराकुंडीत नेऊन टाकला. टोपली स्वच्छ धुवून त्यात काही फुलं ठेवली आणि त्यासोबत छानसं भेटकार्डही ठेवलं. त्या भेटकार्डावर त्याने लिहिलं, 'ज्याच्याकडे जी वस्तू असते; तीच तो इतरांना देतो, कृपया माझी भेट स्वीकार करावी.' ती टोपली त्याने शेजाऱ्याच्या दाराशी ठेवून तो कामावर निघून गेला. दुष्ट व्यक्तीने बराच वेळ वाट पाहिली पण कुणीही भांडायला आलं नाही. त्याने दरवाजा उघडला आणि समोरचं दृश्य पाहून तो शरमिंदा झाला.

तात्पर्य, द्वेषाला प्रेमानेच जिंकता येतं. अग्निने अग्नी कधीच विझत नसतो. यासाठीच युगा-युगाला संत-महापुरुषांनी प्रेमाचाच संदेश दिला. प्रेम हा मनुष्याचा मूळ स्वभाव आहे. तो जागृत करण्याचं कार्य संत-महापुरुष करत असतात. कारण प्रेमाचं दुसरं नाव ईश्वर आहे. सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी म्हणत, ज्या हृदयात प्रेमाची उत्पत्ती होते, तेथे कुणाविषयी वैर-द्वेषाचा भाव उरत नाही. सदैव परोपकाराची भावना निर्माण होते. त्याच हृदयात खऱ्या अर्थाने ईश्वराचा निवास असतो. अशी व्यक्ती स्वत: एक चालतं-फिरतं मंदिर असतं. अशा प्रेमळ व्यक्ती जिथं राहतात ते घर स्वर्गाहून सुंदर बनतं जिथं प्रेम असतं तिथं शांती आणि समाधान नांदत असतं. विश्वाचे शांतिदूत बाबा हरदेसिंहजींचे हेच स्वप्न होते, की या विश्वामध्ये प्रेम आणि शांती स्थापित व्हावी.

- राजेंद्र थोरात...





पौराणिक कथा

# नृग राजाची कथा

आता सीतेला वनात सोडून आल्यानंतर लक्ष्मण श्रीरामांचे सात्वंन करत म्हणाला, "भ्राताश्री, लोकांचं बोलणं मनाला लावून आपण माता सीतेचा त्याग करुन कोणत्या धर्माचं पालन केलं? लोक दुतोंडी असतात. तुमचं दु:ख मला पाहवत नाही."

त्यावर श्रीराम मोठ्या प्रेमाने म्हणाले, "लक्ष्मण, तू सांगतोस ते ठीकच आहे. तू माझ्या आदेशाचं पालन करुन मला संतुष्ट केलंस. याचा मला संतोष वाटतो; परंतु प्रजेकडे दुर्लक्ष करणं हे राजधर्माला अनुसरुन नाही. शिवाय त्याचं पातकही राजाला भोगावं लागतं याबद्दल नृग नावाच्या राजाची कथा तुला सांगतो."

फार पूर्वी नृग नावाचा राजा या पृथ्वीवर राज्य करीत होता. तो राजा मोठा दानी होता. एकदा गायी दान करताना एका गरीब ब्राह्मणाची एक गाय

आपल्या वासरासह राजाच्या दानयज्ञाच्या गायींमध्ये मिसळली. राजाने दुसऱ्या ब्राह्मणाला गायी दान करताना गरीब ब्राह्मणाची गायदेखील वासरासह चुकून दान देऊन टाकली. इकडे गरीब ब्राह्मण बिचारा आपली गाय शोधत खूप भटकला. शेवटी दुसऱ्या ब्राह्मणाच्या पडवीत त्याला आपली गाय बांधलेली दिसली. त्याने पूर्वीच्या नावाने गायीला हाक मारली, 'शबले इकडे ये' ब्राह्मणाचा आवाज ऐकल्याबरोबर गाय धावतच त्याच्या मागोमाग निघाली. दुसऱ्या ब्राह्मणाने ते पाहिले, तोही त्या गायीच्या मागोमाग धावला व ही गाय आपल्याला दानात मिळाली आहे म्हणून त्यावर आपलाच हक्क सांगू लागला. वाद काही मिटेना. दोघांचीही बाजू त्यांच्या दृष्टीने योग्य होती. शेवटी न्यायासाठी दोघे नृग राजाकडे गेले;



परंतु नृग राजाने त्यांना न्याय तर दिलाच नाही पण त्यांची भेटही घेतली नाही. त्यावर दोघाही ब्राह्मणांनी राजाला शाप दिला, हे राजन! आम्ही न्यायाच्या आशेने आलो तर तुम्ही साधे दर्शनही दिले नाही, म्हणून आम्ही दोघे तुम्हाला शाप देतो, की तुम्ही सर्व प्राण्यांपासून लपून राहणारा सरडा बनून गढीत अनेक वर्षे पडून राहाल. ज्यावेळी कृष्णाचा अवतार होईल तेव्हाच तुमचा उध्दार होईल. शापवाणी कानावर पडताच नृगराजा शाप भोगण्यास सिध्द झाला. त्याने आपला पुत्र वसू याच्याकडे राज्यकारभार सोपवला आणि पुढे सरड्याचा शापित जन्म स्वीकारला. ही कथा सांगून पुढे श्रीराम म्हणाले, "यासाठीच लक्ष्मणा, कोणत्याही स्थितीत राजाने प्रजेकडे दुर्लक्ष करु नये. शोक व्याकूळ झाल्यामुळे जर कदाचित माझे प्रजेकडे दुर्लक्ष होत असेल तर हे लक्ष्मणा, तू प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन मला मदत कर."

त्यानंतर श्रीरामांनी लक्ष्मणाला ईश्वांकु वंशातील राजा निमी तसेच वसिष्ठ मुनी यांना शापीत जीवन कसे जगावे लागले याची कथा सांगत विदेहराज जनकाच्या जन्मापर्यंतच्याही कथा सांगितल्या.

लक्ष्मणही श्रीरामांच्या मुखावाटे येणाऱ्या कथा ऐकण्यास उत्सुक होता. कथाकथनामुळे श्रीरामांचे मनही हलके होईल या हेतूने लक्ष्मणाने आणखी एक कथा सांगावी असा हट्ट श्रीरामांकडे धरला.

मग श्रीरामांनी देखील लक्ष्मणाचा हट्ट पुरवत क्षमाशील वृत्तीचा राजा ययाती याची कथा सांगण्यास सुरुवात केली.

क्रमशः

# नेपोलियन बोनापार्ट



फ्रान्सचा सम्राट नेपोलियन बोनापार्ट हा जगातील अत्यंत महान सेनानीपैकी एक सेनानी मानला जातो. आपल्या कारकीर्दीच्या शिखरावर असताना त्याने जवळपास संपूर्ण युरोपवर राज्य केले.

नेपोलियनचा जन्म १५ ऑगस्ट १७६९ मध्ये कॉर्सिका येथे झाला. सैनिक शिक्षण घेऊन त्याने फ्रान्सच्या लष्करात प्रवेश केला. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर निर्माण झालेल्या अस्थिरतेचा त्याने पुरेपूर फायदा घेतला. सैन्यातील महत्त्वपूर्ण पद त्याने मिळवले. १७९९ साली तो फ्रान्सचा सम्राट बनला.

नेपोलियन हा फार शिस्तप्रिय होता. त्याने फ्रान्समधील अस्थिरता व अराजकता दूर करुन फ्रान्सची अर्थव्यवस्थाही सुधारली. सन १८०५ पर्यंत ब्रिटेन, ऑस्ट्रिया आणि रशिया या महासत्तांबरोबर युध्दे करुन त्यांने ऑस्ट्रिया व रशियाला पराभूत केले.

१८१२ साली त्याने रशियावर पुन्हा चढाई केली. तो रशियन सैन्याचा पराभव करत मॉस्कोपर्यंत पोहोचला;पण मॉस्कोतील कडक हिवाळ्याने त्याला माघार घेणे भाग पडले. या चढाईत त्याला सैनिकी आणि आर्थिक मोठे नुकसान सोसावे लागले; पण फ्रान्सला परत आल्यावर त्याने पुन्हा लष्कर सज्ज केले.

मात्र नेपोलियनच्या रशियात झालेल्या हानीमुळे युरोपियन राष्ट्रांना जोर आला. त्यांनी फ्रान्सविरुध्द लढण्याची तयारी सुरु केली. १८१३ साली युरोपची संयुक्त सेना नेपोलियनवर चालून गेली. लिपजिलच्या युध्दात तिने नेपोलियनचा पराभव केला. नेपोलियनला कैद केले. एल्बा येथील कैदेतून सुटून नेपोलियन पुन्हा फ्रान्समध्ये आला. त्याला प्रजेचा आधार मिळाला; पण त्याची तब्बेत बिघडली होती. आजारी असलेला नेपोलियन १८१५ सालचे युध्द हारला.

त्याला सेंट हेलेना येथे कैदेत ठेवण्यात आले. ५ मे रोजी कैदेतच त्याचा मृत्यू झाला. नेपोलियनच्या पराक्रमाच्या कथा आजही मोठ्या अभिमानाने सांगितल्या जातात. नेपोलियन कधीही नकारात्मक विचार करत नसे. प्रत्येक गोष्ट तो वेळेआधीच पूर्ण करत असे त्याला आळस माहीत नव्हता. युध्दभूमीवरही घोड्यावर बसूनच तो काही क्षण डोळे मिटून विश्रांती घेत असे. म्हणूनच त्याला कुठलीही गोष्ट ‘अशक्य’ वाटली नाही.

❑❑❑



कथा :

# आज्ञापालन

माधवरावांना तीन मुलगे होते. तिघेही आज्ञाधारक होते. माधवरावांनी तिघांचीही लग्नं करुन दिली. तिघांनाही संपत्तीची समान वाटणी करुन ते साधूच्या मठात राहू लागले. पुढे काही वर्षे निघून गेली. माधवरावांना संत-सहवास लाभला त्यामुळे त्यांना भक्तीमार्गाची गोडी लागली होती. त्यांच्या गुरुने त्यांना प्रसन्न होऊन अनेक वरदानंही दिली होती. पुढे त्यांचे गुरुदेव तीर्थयात्रा करण्यासाठी निघून गेले.

एके दिवशी माधवरावांना कळून चुकलं, की आता आपला शेवट जवळ आला आहे. त्यांनी आपल्या तिन्ही मुलांना जवळ बोलावून सांगितलं, की माझ्या मृत्युनंतर माझी समाधी बांधा. दर पौर्णिमेला एकेकाने येऊन समाधीवर फुलं आणि

प्रसाद अर्पण करा. मी तुम्हाला काही तरी देऊ इच्छितो. असे सांगून माधवरावांनी आपला प्राण सोडला.

वडिलांच्या इच्छेप्रमाणे तिघाही मुलांनी माधवरावांची समाधी बांधली. पौर्णिमेच्या दिवशी माधवरावांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या समाधीवर फुलं वाहायला कोण जाणार याबद्दल तिघा भावात चर्चा सुरु झाली. मोठ्याने विचार केला, की वडिलांनी होती ती संपत्ती वाटून टाकली. आता त्यांच्याकडे द्यायला आहे काय? शिवाय त्यांचा तर मृत्यू झालाय. त्यामुळे तेथे जाणे टाळण्यासाठी बहाणा करत तो म्हणाला, 'आज माझी तब्येत ठीक नाही, त्यामुळे आज तुमच्यापैकी कोणीतरी जा.' मधला मुलगा म्हणाला, 'आज माझं महत्त्वाचं काम आहे. मी जाऊ शकत नाही.'

शेवटी धाकटा मुलगा फुलं आणि प्रसाद घेऊन पौर्णिमेला वडिलांच्या समाधी स्थळाकडे गेला. तेथे एक गरीब ब्राह्मण बसलेला होता. तो खूप उपाशी दिसत होता. धाकट्या मुलाने समाधीवर फुलं अर्पण केली आणि गरीब ब्राह्मणाला शिऱ्याचा प्रसाद खायला दिला. ब्राह्मण खूप प्रसन्न झाला. त्याने विचारले, 'बाळ तू या समाधीवर फुलं का वाहतोस?' मुलाने आपल्या वडिलांची हकीकत सांगितली. ब्राह्मण म्हणाला, तुझ्या वडिलांना मी ओळखतो. त्यांनी माझ्याकडे एक वस्तू दिलीय, ती तुझ्याकडे सोपवतोय असे म्हणून त्याने आपल्या झोळीतून एक कागद (हुंडी) काढून दिला. त्यात लिहिलेल्या मजकुरानुसार त्यांनी सावकाराकडे ठेवलेल्या सोन्याच्या मोहरा त्याला मिळणार होत्या.

पुढच्या पौर्णिमेला त्याने मोठ्या भावाला फुलं आणि प्रसाद घेऊन जाण्यास सांगितले; पण ऐन वेळी त्याने बहाणा करत जाणे टाळले. मधल्या भावानेही तसेच केले. शेवटी नाईलाजाने धाकटा मुलगा समाधीजवळ गेला. तेथे कोतवाल उभा होता. त्याने धाकट्याची चौकशी केली असता तो माधवरावांचा मुलगा असल्याचे कळले. माधवरावांनी कोतवालाकडे दिलेले जमिनीचे कागद कोतवालाने त्याच्या स्वाधीन केले.


तिसऱ्या पौर्णिमेलाही दोघा भावांनी समाधीकडे जाणे टाळले आणि धाकट्यालाच पाठवले. यावेळी माधवरावांचा मित्र तिथे उभा होता. धाकट्याची ओळख पटल्यानंतर तो म्हणाला, "बाळ! मी माधवरावांचा मित्र आहे. त्यांनी माझ्याकडे या महालाच्या किल्ल्या दिलेल्या आहेत. समाधीवर फुलं वाहायला येणाऱ्या मुलालाच त्या दे असे सांगितले. त्यांच्या इच्छेनुसार तुला मी किल्ल्या सोपवत आहे." अशा प्रकारे धाकट्या मुलाने वडिलांची आज्ञा पाळली. त्यामुळे त्याला वडिलोपार्जित सारी संपत्ती प्राप्त झाली. तो खूप श्रीमंत झाला.

मित्रांनो, आई-वडील-गुरुजनांची नेहमी आज्ञा पाळावी. त्यांच्या आशीर्वादानेच आपले जीवन समृध्द होते.

❑❑❑

# शब्दकोडे १७८

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## आडवे शब्द

२. श्रीगणेशाला एक दात असतो म्हणून त्याला ......... असेही म्हणतात.
५. छत्तीसगड राज्य आधी........ प्रदेश या राज्याचा हिस्सा होता
६. एक हजार किलोग्रॅम बरोबर एक.......
७. १ मे हा दिवस........ दिन म्हणूनही साजरा केला जातो.
८. या देशाची राजधानी टोकियो आहे.
१०. दया........ शांती तेथे देवाची वसती
११. ....... कथा म्हणजे भगवान बुध्दाच्या प्रत्येक जन्माच्या कथा होत.
१३. विदर्भातील एक कापसाचा जिल्हा
१६. मध्य व पश्चिम रेल्वेसारखा मुंबईतील एक रेल्वे मार्ग
१७. हसती दुनिया मधील स्तंभ : ...... विचारु या

## उभे शब्द

१. ताजमहाल कोणाच्या स्मरणार्थ बनवला ?
३. 'अग्नि' या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीत ए. पी. जे अब्दुल...... यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.
४. एक फेब्रुवारी ..... दिन म्हणून साजरा केला जातो.
७. भिंतीलाही ..... असतात(म्हण)
९. गाय हा ..... प्राणी आहे
११. भारतातील सर्वात मोठी मशीद.....मशीद
१२. हाताच्या या भागाला केस नसतात
१३. खालीलपैकी कोणते पात्र त्रेतायुगातील नाही: अंगद, यशोदा, भरत, सुमित्रा
१४. म्हशी -घोडे बांधण्याची जागा
१५. भारतातील सगळ्यात अधिक साक्षरता असलेले राज्य

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

प्रश्न : उत्तम गुरुभक्त कोण आहे ? स्टेजवर बसून विचार करणारा की भक्तजनांच्या चप्पल-बूटांची व्यवस्थित सेवा करणारा ?

उत्तर : उत्तम गुरुभक्त तोच असतो जो गुरुने दिलेली सेवा अत्यंत नम्रपणे, निष्काम भावनेने, मन:पूर्वक करत असतो. गुरुचे विचार स्टेजवरुन उत्तम प्रकारे पोचवणे ही सेवा आहे आणि सत्संग भवनमध्ये सतरंजी अंथरणे, झाडू मारणे, चप्पल-बूटांची देखरेख करणे ही देखील सेवाच आहे. गुरुआदेशानुसार किंवा अधिकारी / प्रमुख यांच्या आदेशानुसार मिळालेली सेवा समर्पित भावनेने करणारा गुरुभक्त हा उत्तम गुरुभक्त आहे.

❖❖❖❖❖❖

प्रश्न : परमात्मा या सृष्टीचा आधार आहे असे म्हटले आहे, मग परमात्मा दिसत का नाही ?

उत्तर : ज्याप्रमाणे एखादी उंच इमारत वर्षानुवर्षे उभी असलेली आपण पाहतो; परंतु ती ज्या मजबूत पायावर उभी आहे तो पाया आपल्याला कधीही दिसत नाही. एखादे वडाचे किंवा पिंपळाचे झाड वादळ-वाऱ्यातही स्थिर उभे असलेले दिसते त्यावेळी आपल्याला जाणवते, की या झाडाची मुळं जमिनीत खोलवर गेलेली असल्यामुळेच हे विस्तीर्ण झाड टिकून आहे. तसे या सृष्टीत करोडो ग्रह-तारे आपापल्या कक्षेत अचूकपणे भ्रमण करत आहेत. पृथ्वीवरील प्रत्येक सजीव-निर्जिव वस्तू वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्याने भरलेली आहे. ऋतुचक्र अव्याहतपणे सुरु आहे. हे सारं एखाद्या मजबूत आधाराशिवाय घडत नाही. तो आधार म्हणजे ज्याला आपण परमात्मा, गॉड, सुप्रीम पॉवर अशा अनेक नावांनी संबोधत असतो. वीजेवर मोठमोठे कारखाने, रेल्वेगाड्या चालतात पण त्यांना ऊर्जा-शक्ती देणारी वीज मात्र दिसत नाही तसेच परमात्मा सर्व कार्याचे कारण आहे, शक्तीचा स्त्रोत असूनही दिसत नाही.

❖❖❖❖❖❖

प्रश्न : आज अनेक लोक धार्मिक आहेत; मग ते एकाच ईश्वराची भक्ती का करत नाही ?

उत्तर : रितीरिवाज, परंपरा, कर्मकांड किंवा धार्मिक विधी यांचे पालन करणारा तो धार्मिक अशी आपली समजूत झालेली आहे. वास्तविक पाहता खरा धर्म ज्याला कळला तोच धार्मिक. परमपिता परमात्मा हाच सत्य आहे. हा एकच असून नित्य व एकरस आहे. अशा या परमसत्याचा बोध होऊन जो या एक प्रभू परमात्म्याचं अस्तित्व चराचर विश्वात पाहून निर्मळ, निर्वेर, निर्लेप जीवन जगतो त्याला धार्मिक म्हटलं जातं. ज्यांच्या जीवनात प्रेम, दया, करुणा, स्नेह इ. दिव्य, ईश्वरीय गुणांचा जोपर्यंत समावेश होत नाही तोपर्यंत ते खरे धार्मिक म्हणता येणार नाही. खरा धर्म तोडत नाही जोडणं शिकवतो.

❖❖❖❖❖❖

❒❒❒



विचारपुष्प

# मूळ हेतू साध्य करावा

आपण दूरदुरुन इथं समागमाला आलात तेव्हा ज्या मूळ हेतूसाठी आपण आलो, तो साध्य झाला की नाही हे पाहणं गरजेचं आहे. इथं आल्यावर आपलं लक्ष विचलित तर झालं नाही ना! की महापुरुषांचे विचार चालू असताना चला कॅन्टीनला जाऊ या, थोडावेळ प्रदर्शनी पाहू या किंवा अन्य ठिकाणी जाऊ या, यातच मूळ हेतू विसरलो तर नाही ना? इथं आपण महापुरुषांचे विचार श्रवण करायला, संगतची चरणरज घ्यायला आलो, तोच मूळ हेतू बाजूला तर पडला नाही ना? अर्थात ह्या ठिकाणी जाणं योग्य आहे; पण अधिक वेळ आपण इतर ठिकाणीच व्यतीत तर केला नाही ना? जर असं होत असेल तर निरंकार कृपा करो, ज्या भावनेने आपण सत्संगात येतो तो भाव कायम राहावा . या बरोबरच हेही भाव मनात येत होते, की

महाराष्ट्राचा प्रांतीय समागम हा मुंबई समागम म्हणूनच एकप्रकारे ओळखला जातो. आता असा प्रयत्न राहील, की महाराष्ट्र राज्यात दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी रोटेशन (फिरता) पध्दतीने समागम आयोजित केले जावेत. महाराष्ट्रात ज्या-ज्या ठिकाणी शक्य असेल त्या-त्या ठिकाणी समागमाचा आनंद घेतला जाईल. यावर विचारविनिमय करुन पुढे जो काही निर्णय होईल तो आपल्या चरणी सादर केला जाईल. मिशनचं जे मूळ आहे तर ते ब्रह्मज्ञान आहे. त्यासोबत आपल्या मनात दया, करुणा, विशालता, प्रेम या भावना असतील तर जगातील कोणतेही चढ-उतार आपल्या मनःस्थितीला दोलायमान करु शकणार नाहीत. ब्रह्मज्ञान जीवनात उतरवून ज्ञानानुसार जर आपण प्रत्येक क्षण व्यतीत केला तर जीवन सफल होईल. अन्यथा ज्ञान घेताना आम्ही केवळ ज्ञान घेतलं पण ते समजून घेतलं का ? ज्ञानप्रदान समयी आमचं मन इकडेतिकडे भटकत तर नव्हतं ना ? किंवा मनात काही शंका होत्या त्या शंकांच निरसरन केलं का ? जर अजूनही मनात काही भ्रम-शंका असतील तर त्याचं निराकारण आपण स्थानिक पाताळीवर किंवा ज्ञानप्रचारक महात्म्यांकडून किंवा मुखी / प्रमुख इ. अनुभवी महात्म्यांकडून करुन घ्यावे. मिशनची तत्व, सिध्दांत मूळ रुपात आपल्या जीवनात यावीत सत्संगात येणं हा केवळ सोपस्कार होऊ नये. केवळ सत्संग श्रवण केला आणि घरी गेलो;पण त्यावर मनन-चिंतन अनुकरण-अनुसरण केलं नाही. असं व्हायला नको. मिशनची एकेक बाब नीट समजून घेऊन आपण मिशनचे चालते-बोलते प्रचारक बनले पाहिजे. जोपर्यंत सर्व गोष्टींची समज सुस्पष्टपणे होत नाही तोपर्यंत प्रयत्न केले पाहिजेत. या जीवनाचा तर काही भरोसा नाही आता श्वास चालू आहे. आपण बोलत आहोत; पण पुढच्या क्षणी श्वास थांबूही शकतो. तेव्हा जेवढं जीवन आहे ते *Self realization throught good realization* (परमात्म्याच्या अनुभूतीतून आत्मानुभूतीकडे) या नुसार स्वतःची ओळख, आत्मज्ञान प्राप्त करुन सफल करायचं आहे आणि हे जाणून घ्यायचं आहे, की या जगात आपण कशासाठी आलो ? आपल्याला कुठं जायचय ? काय प्राप्त करायचं आहे ? कोणते गुण धारण करायचे आहेत ? कोणत्या गोष्टींपासून दूर राहायचं आहे ? क्षणोक्षणी या निरंकाराचे आभारच मानायचे आहेत. ज्यांना अजून ब्रह्मज्ञान प्राप्त झालं नाही, त्यांनी सत्संग समाप्तीनंतर ब्रह्मज्ञानाची प्राप्ती अवश्य करावी.

❒❒❒






कथा :

# आईच्या प्रेमाची किंमत

सम्राट चंद्रगुप्त मौर्याची राजधानी पाटलीपुत्र (सध्याचे पाटणा शहर) होती. आपल्या प्रेमळ आईला राजमातेचा सन्मान देऊन त्याने राजमहालात ठेवले होते. राजमातेच्या पदावर असूनही विधवा मुरा अत्यंत साधेपणाने आपले जीवन जगत होती. एका संध्याकाळी चंद्रगुप्ताने सन्मानाने राजमातेला बोलावले. सम्राट आईला म्हणाले, "तुझी जी इच्छा असेल ते माझ्याकडे माग." राजमाता मुरा राजसिंहासनावर बसलेल्या चंद्रगुप्ताचे बोलणे ऐकत होती आणि स्वत: काही बोलत नव्हती. सम्राट चंद्रगुप्ताने पुन्हा आग्रहपूर्वक इच्छेनुसार काहीही मागण्यास सांगितले. राजमाता मुरा गंभीर झाली, तिने विचार करण्यासाठी काही दिवसांची मुदत मागितली.

थंडीचे दिवस होते. राजमहालात सम्राट चंद्रगुप्त मौर्य जेवणानंतर झोपायला जाणार होते.

तेवढ्यात राजाच्या विश्रांतीगृहात राजमातेने प्रवेश केला आणि दासीकडून एक भांडे पाणी मागवले व पाण्याने पलंग ओला केला.

थोड्या वेळात सम्राट विश्रांतीगृहात पोहोचले. पलंगावर बसल्यावर त्याला पलंग ओला असल्याचा जाणवला. सम्राट चंद्रगुप्त एकदम उभे राहिले आणि रागाच्या भरात पलंग ओला होण्याचे कारण विचारत सर्व दास दासींना कठोर शिक्षा सुनवायला सुरुवात केली. विश्रांतिगृहाच्या कोपऱ्यात उभी असलेली राजमाता प्रेमाने म्हणते, "आठव, मागच्या आठवड्यात तू मला माझ्या इच्छेनुसार काहीतरी मागायला सांगितले होते." थोडा वेळ थांबून राजमाता म्हणाली, "चंद्रगुप्ता, मला हे पाहून आश्चर्य वाटले की आज एका क्षणासाठी तू ओली गादी सहन करु शकला नाही आणि रागाने ओरडायला शिक्षा द्यायला सुरुवात केली. आता मला हेच सांगायचे आहे की, या दु:खी आईनं तू ओल्या केलेल्या गादीवर न जाणो किती रात्री घालवल्या आहेत. तू सम्राट होऊन माझ्या रात्री परत करशील? विजयाच्या लालसाने तू अहंकारी बनला. याच अहंकाराने अनेक राजे आणि महापुरुषांचा नाश झाला आहे. चंद्रगुप्ता! तू आचार्य चाणक्यांची शिकवण आणि आईचं प्रेम विसरुन गेलास."

हे सर्व ऐकून चंद्रगुप्त सर्व दासदासींच्या समोर भावविवश होऊन राजमातेच्या पाया पडला आणि पश्चात्तापाच्या अश्रूंनी क्षमा मागू लागला.

साभार



# आईचे प्रेम

दुखात हसवी, सुखात झुलवी
गाऊनी गोड अंगाई
जगात असे काही नाही
जशी माझी प्रिय आई!

ठेच लागता माझ्या पायी
वेदना होती तिच्या ह्रदयी
सकळ देवतांहूनी
श्रेष्ठ मला माझी आई!

मायेच्या पंखाखाली
ठेवी सदा अपुली पिल्ले
लक्ष्य तिचे बाळावरती
दूर कुठे ती जर गेली
अशी ही एकच आई!

आई तुझे प्रेम महान
आई तुझे मी लेकरु
तुझ्या चरणी सदा
माझा प्रणाम असो!




# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा




कोल्ह्याने बैल आणि सांबर यांच्याशी मैत्रीचे नाटक केले आणि त्याप्रमाणे ते दोघेही त्या लबाड कोल्ह्याच्या जाळ्यात फसले
काही दिवसांनतर त्याने आपल्या योजनेनुसार बैल आणि सांबर यांच्यामध्ये फुट पाडण्यासाठी एक दुसऱ्याचे कान भरण्यास सुरुवात केली.
तो सांबरला म्हणाला, मित्रा, तुला बैल ठार मारणार आहे, असे तो मला म्हणाला.



दुसऱ्या दिवशी कोल्हा बैलाकडे जाऊन म्हणाला की सांबर तुला मारायला टपला आहे.
अशाप्रकारे कोल्ह्याने दोघांच्याही मनात एकमेकांबद्दल शंका निर्माण केली कारण ते दोघेही हलक्या कानाचे आणि अहंकारीसुध्दा होते
ते कोल्ह्याचे सांगणे खरे मानून दोघेही शत्रूसारखे वागायला लागले आणि वेगळे वेगळे राहायला लागले
कोल्ह्याने आपल्या योजनेनुसार त्यांना भडकवण्याचे काम चालू ठेवले


एके दिवशी दोघेही रागाने एक दुसऱ्याच्या समोर आले कोल्ह्याने पाहिले, की हे आता लढण्यासाठी मैदानात उतरले आहेत
त्यांची झुंज बघण्यासाठी तो झाडाच्यामागे लपून बसला
ते दोघेही झुंज घेऊन रक्तबंबाळ होऊन पडले
धोकेबाज कोल्ह्याने या संधीचा फायदा घेतला आणि दोघांनाही ठार मारले
दोघांच्या मैत्रीमध्ये तिसऱ्याची दुष्ट बुद्धी वैर निर्माण करते. म्हणून मैत्री विचारपूर्वक पारखून करायची




# साधुबोध

एक मुक्त व स्वच्छंदी साधुपुरुष होता. एके दिवशी एका हातात काठी व खांद्याला झोळी अडकवून तो एकटाच देशभ्रमण करण्यास निघाला. दिवसभर तो पायी चालत असे व संध्याकाळनंतर एखाद्या गावात थांबत असे. गावकरी त्याला जी भिक्षा देत त्यात तो समाधान मानीत असे. रात्री सर्वजण मिळून ईश्वराचे नामस्मरण करीत असत.

एके दिवशी हा साधू फिरता फिरता एका गावी पोचला. गावाजवळच त्याने आपला मुक्काम ठोकला. भिक्षेसाठी जेव्हा हे साधूबाबा गावात गेले तेव्हा त्यांना तेथे भांडण सुरु असल्याचा कोलाहल ऐकू आला. त्यांना राहवले नाही. ते भांडणाऱ्या लोकांजवळ गेले. भांडणाचे कारण एक जमिनीचा तुकडा होते. रामलाल व श्यामलाल या दोन भावांमध्ये हे भांडण सुरु होते. त्यांचे वडील मरण्यापूर्वी आपल्या जमीन-इस्टेटीच्या वाटण्या करुन गेले होते; परंतु जमिनीचा हा तुकडा नेमका त्या वाटणीत राहून गेला होता. हा जमिनीचा तुकडाच त्या भावांमधील वैमनस्यास कारणीभूत ठरला होता.

साधूबाबांनी त्या दोन्ही भावांना आपल्याजवळ बोलावले व म्हटले, “तुम्ही दोघे सख्खे बंधू असूनही एकमेकांचे रक्त सांडत आहात. प्रथम हे सांगा की, पूर्वी ही सर्व शेती कोणाच्या नावावर होती?” रामलाल म्हणाला, “सर्व जमीन वडिलांच्याच नावावर होती.” यावर साधूबाबा म्हणाले, “मग काय तुमचे वडील गेल्यानंतर पूर्ण जमीन आपल्याबरोबर घेऊन गेले?”

श्यामलालने उत्तर दिले - “नाही. वडील तर सर्व काही येथेच ठेवून स्वर्गवासी झाले.”

यावर साधूबाबा हसले व म्हणाले, “बाळांनो, ठीक त्याच प्रकारे तुम्ही दोघे भाऊही एक ना एक दिवस हे सर्व येथेच सोडून देवाघरी जाणार आहात. तर मग जमिनीच्या ज्या तुकड्यावरुन तुम्ही भांडत आहात तो तुकडाही येथेच राहील. होय ना? मग भांडण कशाकरिता? प्रेमाने राहा... एकमेकांशी चांगला व्यवहार करा. हेच चांगले कर्म व पुण्य तुमच्याबरोबर परलोकातही जाईल.”

साधूबाबांचे हे म्हणणे ऐकून दोन्ही भावांना आपली चूक कळून आली व त्यांनी साधुबाबांचे पाय धरुन त्यांची माफी मागितली. दुसऱ्या दिवशी साधूबाबांनी प्रस्थान करण्याचा विचार बोलून दाखविला. गावकऱ्यांनी त्यांना काही दिवस त्यांच्या गावातच राहण्याची विनंती केली. यावर साधूबाबा म्हणाले, “... वाहते पाणी व रमता जोगी कधीच एका जागी थांबत नाही!”

- साभार



# अन्यायावर मात

एका लबाड सावकाराने एका शेतकऱ्याचे झोपडीवजा घर भाड्याने घेतले. पंधरावीस वर्षे त्याने ते आपल्या नोकरांना राहण्यासाठी दिले व त्याचे शेतकऱ्याला भाडेही दिले; पण पुढे शेतकऱ्याला भाडे द्यायचे त्याने बंद केले व ते घर आपलेच आहे, असे तो म्हणू लागला. हा व्यवहार विश्वासावर झाल्याने त्या शेतकऱ्यापाशी लेखी पुरावा नव्हता. तरीही त्याने ते घर आपल्याला मिळावे म्हणून त्या सावकाराविरुध्द नायालयात दावा दाखल केला. न्यायालयात दावा सुनावणीला निघण्याच्या आदल्या दिवशी रात्री तो लबाड सावकार पाचशे रुपयांची थैली घेऊन न्यायमुर्तींकडे गेला. त्यांना म्हणाला, "साहेब! ती झोपडी जरी त्या शेतकऱ्याची असली, तरी मी त्याला त्याचे गेली वीस वर्षे भाडे दिलेले आहे. ती जर माझ्या मालकीची झाली, तर ती पाडून मी तिच्या जागी माझ्या दुसऱ्या मुलासाठी बंगला बांधीन. तेव्हा हे पाचशे रुपये घ्या आणि उद्या न्यायालयात माझ्या बाजुने निकाल द्या." त्या नायाधीशाने काहीएक न बोलता ती पाचशे रुपयांची थैली घेतली.

सावकार मोठ्या खुशीत आपल्या घरी निघून गेला. दुसऱ्या दिवशी न्यायालयात दावा सुनावणीला निघाला असता न्यायमूर्तींनी त्या सावकाराला विचारले,

'ईश्वराला स्मरुन सांगा, की ती झोपडी खरी कुणाची आहे ? कारण या शेतकऱ्यांचे म्हणणे असे आहे की, ती त्याची आहे.' सावकार ईश्वराची शपथ घेऊन म्हणाला, "साहेब ! ती झोपडी माझीच होती आणि आजही माझीच आहे. म्हणून तर ती माझ्या ताब्यात आहे. या गावतले एक दोनच नव्हे, तर शंभर साक्षीदार ती झोपडी माझी आहे, सांगण्यासाठी मी न्यायालयात उभे करु शकेन." न्यायमूर्तींनी त्या शेतकऱ्याला विचारलं, "काय रे बाबा, ती झोपडी तुझी आहे, हे सिध्द करणारा एखादा पुरावा आहे का तुझ्यापाशी ? निदान ती झोपडी तुझी आहे असे सांगणारा या गावातला एखादा साक्षीदार तरी तू इथे आणू शकशील का ?"

दु:खी स्वरात शेतकरी म्हणाला, "नाही साहेब, सावकार श्रीमंत असल्याने, जेव्हा त्याने त्याच्या गडी माणसांना राहण्यासाठी ती झोपडी माझ्याकडे मागितली, तेव्हा तो माझी गरीबाची झोपडी हडप करणार नाही, या विश्वासाने मी त्याच्याकडून काहीएक लिहून न घेता त्याच्या स्वाधीन केली. गेली बरीच वर्षे त्याने मला त्या झोपडीचे भाडेही दिले. पण जेव्हा त्याने भाडे देण्यास नकार दिला व ती झोपडी आपलीच असल्याचे सांगू लागला, तेव्हा मला न्यायालयात यावे लागले. पैसा व दरारा यांच्या जोरावर सावकार शंभरच नव्हे तर पाचशे साक्षीदारसुध्दा त्याच्या बाजूने उभे करील, पण मज गरीबाची बाजू घेऊन, या सावकाराला दुखविण्याचं धारिष्ट्य या गावात कोण करील ?" सावकार म्हणाला, "कळलं ना साहेब, किती खोटं बोलतो आहे हा ? ती झोपडी याची आहे, असे सांगणारा एकही लेखी पुरावा याच्यापाशी नाही आणि एकही साक्षीदार हा इथे आणू शकत नाही, तेव्हा ती झोपडी माझी आहे, हे आपल्याला पटलं ना ?" न्यायमूर्ती सावकाराला म्हणाले, "तुझी बाजू सत्याची आहे, असे सांगणारे शंभर साक्षीदार तू माझ्यापुढे आणायला तयार आहेस, पण ती झोपडी या शेतकऱ्याची आहे असे सांगणारे पाचशे साक्षीदार अगोदरच माझ्याकडे आलेले आहेत." याप्रमाणे बोलून व आदल्या दिवशी सावकाराने लाच म्हणून दिलेले पाचशे रुपये टेबलावर ठेवून, न्यायमूर्ती त्याला म्हणाले, "ती झोपडी त्या शेतकऱ्याची असूनही ती गिळंकृत करण्यासाठी काल तू माझ्या घरी आणून मला दिलेले हे पाचशे रुपये, या शेतकऱ्याची बाजू न्यायाची आहे, असं ठणकावून सांगणारे पाचशे साक्षीदार आहेत. तेव्हा तू आज संध्याकाळपर्यंत ती झोपडी या शेतकऱ्याला द्यावीस. तू मला लाच देण्याचा प्रयत्न केलास म्हणून तू सरकारात १००० रुपये दंड भरावा आणि लाच म्हणून तू मला देऊ केलेले हे पाचशे रुपये तू या शेतकऱ्याला त्या झोपडीची डागडुजी करण्यासाठी द्यावे, असा मी निर्णय देत आहे."

❑❑❑

सत्संगामुळे मुलांनाही लहानपणापासूनच सेवेचे संस्कार प्राप्त होत आहेत. समाजाला सुंदर रुप देण्यासाठी मुलांना उत्तम संस्कार देणे विशेष महत्त्वपूर्ण आहे. वास्तविक मर्यादेमध्ये राहून विनम्रतेने केलेली सेवाच श्रेष्ठ ठरते. भक्त सामाजिक आणि पारीवारिक जबाबदाऱ्या निभावत तप-त्यागाच्या भावनेने युक्त होऊन निरंतर सेवा करत आहेत.

– बाबा हरदेवसिंहजी महाराज

# सुट्टी लागली



चला गड्यांनो सुट्टी लागली
गावाला जाऊ
डोंगरावरी पिकलेला
रानमेवा खाऊ ।।ध्रु।।



गोड रसाने भरलेली
काजूची बोंडे
डोंगरातली काळीमैना
खाऊ करवंदे
खळखळणाऱ्या ओढ्यामध्ये
मनसोक्त न्हाऊ ।।१।।

नेम धरुन पिकलेले
पाडू या आंबे
करुन गडका काठीची
पाडू या रातांबे
रानपाखरांच्या गाण्याचा
कानोसा घेऊ ।।२।।





मजेत जाऊ शेतावरती
खेळू पाण्यासंगे
हात लावुनी रोपांना
रंगू त्यांच्या रंगे
आनंदाचे जीवन गाणे
सारेजण गाऊ ।।३।।

- सुरेश तिर्लोटकर



## आरोग्याचा मंत्र

# हृदयाला शक्ती देणारे फळ - डाळिंब



भारतीय चिकित्सा पध्दतीनुसार डाळिंब हे फळ सहजतेने पचणारे आणि हृदयाला शक्ती देणारे आहे. इंग्रजीत याला 'पॉमग्रेनिट' म्हणतात, तर याचे वनस्पतीशास्त्रीय नाव आहे 'पुनीका ग्रेनेट्स'. डाळिंबाच्या तीन जाती आहेत. डाळिंबात लहान-लहान दाणे असतात. दाण्यांच्या रंगावरुन डाळिंबाचे तांबडे व पांढरे असे दोन प्रकार पडतात.


आयुर्वेदानुसार गोड डाळिंब वात, कफ व पित्त दोषहारक आहे. त्याचप्रमाणे ते तृप्तीदायक, मलशोषक, स्निग्ध, बुध्दी आणि बलवर्धक आहे. आंबट डाळिंब हे पित्तकारक आणि वायू-कफनाशक आहे. पौष्टिकतेच्या दृष्टीने डाळिंबामध्ये जीवनरक्षक पोषक तत्त्व कार्बोहायड्रेट, क जीवनसत्त्व, खनिज क्षार (कॅल्शियम, फॉस्फरस, लोह इत्यादी) भरपूर प्रमाणात आढळतात. थायमिन, रायबोफ्लेविन, नायसिन आदी बी कॉम्प्लेक्स गटातील अनेक जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. १०० ग्रॅम डाळिंबाचे दाणे खाऊन ६५ किलो कॅलरी (ऊर्जा) प्राप्त होते.

### डाळिंबाचे औषधी उपयोग -

- नियमितपणे डाळिंब खाल्ल्याने स्वास्थ्य चांगले राहते. स्मरणशक्ती वाढते आणि हृदयरोगांपासून बचाव होतो.
- डाळिंबाचे साल पाण्यात उकळून त्या पाण्याने सकाळ-संध्याकाळ गुळण्या केल्यास कोणत्याही प्रकारची मुखदुर्गंधी दूर होते.
- डाळिंबाची साले सुकवून त्यांचे बारीक चूर्ण करुन गुलाबपाण्यात घालून उटण्याप्रमाणे चेहऱ्याला लावल्यास डाग, सुरकुत्या कमी होतात.
- डाळिंबाच्या सेवनाने जळजळ, उलटी होणे, आबंट ढेकर येणे, उचकी लागणे आदी विकार बंद होतात. रक्त शुध्द होते, पचनक्रिया सुधारते.
- जुलाब होत असल्यावर डाळिंबाची सुकवलेली १५ ग्रॅम साल आणि दोन लवंग एकत्र वाटून ग्लासभर पाण्यात उकळावे. गाळून दिवसातून तीन वेळा अर्धा-अर्धा कप घ्यावे.
- डाळिंबाचा रस, सैंधव व मध एकत्र मिसळून घेतल्यास अरुची दूर होते.
- डाळिंबाचा रस नियमित दिल्यास मुलांच्या पोटात कृमी होत नाहीत.
- डाळिंबाच्या दाण्यांवर मिरपूड, काळे मीठ टाकून चोखून खाल्ल्यास पोटदुखी बरी होते.
- कावीळ : डाळिंबाच्या दाण्यांवर खडीसाखर घालून वा डाळिंबाच्या रसात खडीसाखर टाकून घेतल्यास लाभ होतो.
- वारंवार लघवीला होत असल्यास ५ ग्रॅम डाळिंबाच्या सालींचे चूर्ण ताज्या पाण्याबरोबर दिवसातून तीन वेळा घ्यावे.
- डाळिंबाची साल तोंडात ठेवून चोखल्यास वा त्याचे पाणी गाळून मुलांना पाजल्यास खोकला कमी होतो.
- आंबटगोड डाळिंबाच्या दाण्यांचा १०० मिली रसात खडीसाखर मिसळून रोज दुपारी घेतल्यास उन्हाळ्यात घोळणा फुटल्याने नाकातून रक्त येणे बंद होते.

❑❑❑

# आसन : सुप्त वज्रासन



या सुप्त वज्रासनाची आसन अवस्था अर्ध शवासनाप्रमाणे असते. काही अंशी ते मत्स्यासनाच्या कक्षेतील समजले जाते. वज्रासनापेक्षा शरीरास अधिक शक्ती प्राप्त करुन देते.

कृती :- प्रथम वज्रासनाच्या आसन अवस्थेत बैठक घ्या. नंतर हातांच्या कोपरांच्या साहाय्याने जमिनीवर आडवे झोपा. पाठीचा स्पर्श जमिनीला



व्हायला हवा. त्यानंतर चित्रात दाखविल्याप्रमाणे छातीवर दोन्ही हातांची घडी करा. नंतर केवळ टाळू जमिनीला चिकटेल अशाप्रकारे डोके आतील बाजूस ओढा. आठ ते दहा सेकंदांपर्यंत या आसन-अवस्थेत राहा. सुरुवातीला काही दिवस पाठीचा



संपूर्ण भाग जमिनीस टेकला जाणार नाही. पाठीला थोडे बाक राहील. परंतु सरावानंतर हे आसन चांगल्या प्रकारे करता येईल. या आसनाची दिवसातून तीन-चार आवर्तने करावीत.

**फायदे :-**

१) या आसनात पाठीचा कणा ताणला जात असल्याने पाठिला कुबड असेल तर या आसनाच्या सरावाने नाहीसे होते. मेरुदंड लवचिक बनतो.

२) हे आसन नियमितपणे केल्यास कुंडलिनी शक्ती सहजगत्या ऊर्ध्वगमन करु लागते.

३) या आसनाच्या नित्य सरावाने पायांचे सांधे व स्नायु सशक्त बनतात.

४) या आसनामुळे छाती, पाठीचा कणा व मान या शरीराच्या भागांना चांगला व्यायम मिळतो. ते अवयव कार्यक्षम बनतात.

५) या आसनामुळे सर्व अंत:स्त्राव ग्रंथी सक्रीय बनतात. त्यामुळे शरीर निरोगी व स्फूर्तीशील राहते.

६) मधुमेह झालेल्या रोग्यांसाठी हे आसन अत्यंत फायदेशीर आहे. कारण या आसनामुळे स्वादुपिंडातील (पँक्रियास) सर्व पेशी सक्रीय बनतात, तसेच रक्ताभिसरण चांगल्या प्रकारे होते. त्यामुळे स्वादुग्रंथी कार्यक्षम बनून नैसर्गिक स्वरुपात कार्यरत होतात.

७) या आसनामुळे ओटीपोटाच्या भागावर चांगलाच ताण पडत असल्याने पोट, आतडी. लिव्हर (यकृत), किडनी, प्लीहा यातील दोष दूर होऊन ते सदृढ बनतात, तसेच या आसनामुळे पोटातील इतर तक्रारीही नाहीशा होतात.

८) अजीर्ण, वायुविकार, बध्दकोष्ठता आणि मूळव्याधीसाठी हे आसन म्हणजे 'रामबाण औषध' आहे!

❏❏❏

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


आर्यन साईल


अमन बचाटे



अनन्या विचारे


अवनी बामणे


दिया कारंडे


कैवल्य तांदळे


ओवी पाटील



प्राची देसाई



रवित जाधवानी


रेहान मुलानी


रियांश मालवे


रुही नरे


साची महाजन


सलोनी पाटील


समर्पण राणे


# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



सर्वज्ञ निकम



सावनी पाटील



शर्वरी आग्रे



शिशा सुर्यवंशी



श्रध्दा जाधव



सिदांत पाटील



सौम्या साखरे



स्मृती जालगांवकर



सुहानी सावर्डेकर




सुरभी टीळे



सुयोग शेलार



वंश विचारे



वरद तांदळे



वीर सहाने



विहन आग्रे



दुर्गभ्रमंती

# अवघड नाळेचा - बिष्टागड




बिष्टागड, साल्हेरपासून पूर्वेला पसरलेल्या डोंगररांगेवर उभा असणारा एक किल्ला. नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात समुद्रसपाटीपासून १०३० मीटर उंचीवर असलेला हा गड स्थानिक लोकांमध्ये 'गवळी राजाचा किल्ला' या नावाने परिचित आहे. प्राचीन गुहा, कातळकोरावी टाकी व वाड्याचे चौथरे बाळगून उभा असणारा हा गड याच्या अवघड नाळेच्या वाटेमुळे दुर्गम आहे.

बिष्टागडास भेट देण्यासाठी प्रथम नाशिक जिल्ह्यातील सटाणा या तालुक्याच्या गावी पोहोचावं लागतं. येथील बसस्थानकावरुन सटाणा-नामपूर बस पकडून मार्गावरील खिरमणी गावाच्या फाट्यावरुन पायउतार व्हायचं. या फाट्यावरुन साधारण एक किलोमीटर चालल्यावर पहिल्यांदा खिरमणी गाव व तेथून पुढे आणखी दोन किलोमीटरवर बिष्टागडाशेजारचं कोटबेल गाव लागतं. कोटबेलमधून बिष्टागडाचा माथा चांगला दोन तासाच्या पायपीटीचा आहे. गावाच्या पिछाडीस टेलिफोनचा टॉवर असून तेथून डांबरी रस्त्याच्या डाव्या बाजूने जाणारी पायवाट बिष्टागडाकडे जाते. पहिल्यांदा एक ओढा पार करुन पुढे शेतवडीतून बांधाबांधाच्या वाटेनं पुढे वाटचाल करावी लागते. टॉवरपासून साधारण पाऊण तासात गडाशेजारच्या एका टेकडीच्या पायथ्याला येऊन पोहोचतो.

**दक्षिण बाजू बरी -**

बिष्टागडाला त्याच्या उत्तरेच्या खिंडीतून वर चढणारी वाट आहे. पण ही वाट काटेरी निवडुंगाच्या नाळेतून वर चढणारी व बऱ्याचपैकी अवघड असल्यामुळे या नाळेतून न जाता दक्षिण बाजूनं वर चढायचं, त्यासाठी गडाच्या डोंगराला डाव्या हातानं पूर्ण वळसा मारुन खालच्या बाजूकडील पठारावर पोहोचायचं. गडाच्या पिछाडीस म्हणजे पश्चिमेला गडाला खेटूनच एक डोंगर उभा असून हा डोंगर व गड यांच्यामधून वर जाणाऱ्या वाटेने गड जवळ करायचा. ही वाट तशी सहजसोपी असल्यामुळे १५-२० मिनिटांत माथ्याशेजारी पोहोचता येते. या ठिकाणी डाव्या हाताला गडाच्या पोटाच्या कातळात खोदून काढलेल्या चार प्रशस्त गुहा असून त्यांच्या खालचा टप्पा

कोसळल्यामुळे या गुहेत जाण्यासाठी पायवाट थोडी अवघड झाली आहे. गुहा लांबूनच बघून गडमाथ्यावर पोहोचणं सोयीस्कर ठरतं.




## गवळी राजाच्या वाड्याचे चौथरे

माथ्यावर वाटेच्या डाव्या हातासच पिण्यायोग्य थंडगार पाण्याचं टाकं असून त्याचं पाणी मात्र थोडं खालच्या बाजूस आहे. हे टाकं पाहून त्याच्या शेजारुन वर चढणाऱ्या कातळकोरावी पायऱ्यांनी अंतिम माथा गाठायचा. माथा बराच मोठा असून त्याच्या मध्यभागी सपाटीवर शिबंदीच्या घरट्यांचे चौथरे पाहायला मिळतात. हे १५-२० काळ्या पाषाणातील वाड्यांचे चौथरे पाहिल्यानंतर या गडावर इतिहासकाळात बऱ्यापैकी शिबंदी असेल याची कल्पना येते. या चौथऱ्यांना गवळी राजाच्या वाड्याचे चौथरे म्हणतात.

## नैसर्गिक कातळकडे

हे चौथरे पाहून गडावरील सपाट पठाराच्या काठाकाठाने सहज एक गडफेरी मारायची. या फेरीत नैसर्गिक कातळकड्यांमुळे या गडास तटबंदी बांधण्याची गरज भासलेली नाही, हे पटकन लक्षात येतं.

गडाच्या माथ्यावरुन भवानी मातेच मंदिर व कोरडी टाकी असणारा कऱ्हागड, अजमेरा किल्ला, दुंधागड, पिसोळेगड व डेरमाळ असा बराच लांबवरचा मुलुख न्याहाळता येतो. वर वर्णन केलेल्या अवशेषांशिवाय बिष्टागडावर तसे फारसे दुर्गअवशेष नसल्यामुळे गडाच्या फेरीस पाऊण तासाचा वेळ पुरतो. बिष्टागडाची एकंदरीत बांधणी पाहता हा गड शिवपूर्वकालीन आहे, हे सहज ओळखता येतं. स्थानिक लोक या गडास परंपरेनं 'गवळी राजाचा किल्ला' म्हणतात.



शिवकाळात बिष्टागड मोगलांच्या ताब्यात होता. या व्यतिरिक्त या गडाचा फारसा इतिहास उपलब्ध नाही. बिष्टागड पाहून आपणास सटाण्याला परतताना वाटेतील दोघेश्वर हे रम्य झाडीतील महादेव मंदिर पाहता येईल. हे ठिकाण अत्यंत सुंदर असून येथे बारमाही पिण्याच्या पाणाची सोय व शेजारीच धर्मशाळा आहे. या भागातील हे प्रसिध्द तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथे आजूबाजूच्या लोकांचा नेहमी राबता असतो.

❑❑❑

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे





**प्रश्न : कृष्णविवर किंवा ब्लॅकहोल कशाला म्हणतात ?**

**उत्तर :** पृथ्वीच्या आकर्षणाचा जोर, पृथ्वीपासून लांब जात राहिले तर कमी होत जातो. त्यामुळे एका ठराविक वेग मर्यादेहून अधिक वेगाने जर एखादी वस्तू पृथ्वीपासून लांब फेकली तर ती परत येत नाही. कारण तिला परत खेचून घ्यायला पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण अपुरे पडते. ही वेग मर्यादा ११.२ किलोमीटर दर सेकंदाला इतकी असून तिला 'सुटकेचा वेग' म्हणतात.

समजा, एखाद्या वस्तुपासून सुटकेचा वेग प्रकाशाच्या वेगापेक्षा म्हणजे सेकंदाला ३ लक्ष किलोमीटरपेक्षा जास्त असेल तर प्रकाशकिरणे त्या वस्तुपासून निसटू शकणार नाहीत. मग ती वस्तू दिसणार कशी ? दिसणार नाहीच. म्हणून तिला 'कृष्णविवर' किंवा 'ब्लॅक होल' म्हणतात. ज्या प्रमाणे खोल विहिरीत टाकलेली वस्तू गडप होते तसेच कृष्णविवर आसपासच्या वस्तुंना आपल्याकडे खेचून गडप करुन टाकते.

कृष्णविवराकडे झेपावताना गुरुत्वाकर्षण बलात अमर्याद वाढ होत जाते. त्यामुळे कुठलीही वस्तू छिन्न-भिन्न होऊन जाते. कृष्णविवराभोवती एक क्षितीजाकार गोल असतो. त्यात शिरल्यावर बाहेरच्या जगाशी संपर्क तुटतो. म्हणून अशी छिन्न-भिन्न झालेली वस्तू त्यात पडल्यावर पुढे तिचे काय होते ? हे आपल्यासारख्या बाहेरच्या निरीक्षकाला कळायला मार्ग नाही; पण गुरुत्वाकर्षणाचा आईनस्टॉईनचा सिध्दांत असे सांगतो की ती वस्तू कृष्णविवराच्या केंद्राशी पोचल्यावर तिथे कालअवकाश याची सीमा गाठते व तिच्या भवितव्याचाच अंत होतो.

**प्रश्न : कोळशाला 'काळा हिरा' का म्हणतात ?**


**उत्तर :** माणसाच्या ऊर्जेच्या शोधाच्या इतिहासात कोळशाचा इंधन म्हणून शोध हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. कोळसा हे एक महत्त्वाचे इंधन आहे. कोळशाचा शोध लागल्यावर कोळसा वापरुन पाण्याची वाफ करुन त्यावर चालणारी सयंत्रे तयार करण्यात आली. ही सयंत्रे औद्योगिक क्रांतीची नांदी ठरली. म्हणून कोळशाला 'काळा हिरा' म्हणतात.

**प्रश्न : काकडीचे वरचे टोक कडू का लागते ?**

**उत्तर :** बऱ्याचदा आपणास काकडीच्या वरच्या टोकाची चव कडू लागते. तेव्हा काकडी कडू आहे असे समजून फेकून देऊ नये; कारण टोकाच्या या भागानंतर आपल्याला बाकीच्या काकडीची चव सामान्य लागते. याचे कारण म्हणजे काकडीच्या वेलामध्ये टेट्रासायक्लीफ ट्रायटरपीन नामक रासायनिक पदार्थाचा एक समूह आढळतो. त्यामध्ये कुकरबिटासीन नामक एका रसायनाचा समावेश असतो. या रसायनाची चव कडू असते. काकडीच्या वरच्या भागाचा देठ वेलीला चिकटलेला असल्याने कुकर बिटासीन या रसायनाचा काही अंश काकडीच्या वरच्या भागात जमा होतो. त्यामुळे काकडीचा वरचा भाग कडू लागतो.

❐❐❐

# हे मानवा - तू स्वत:ला घडव



जगात आपण पाहतो, माणूस कसा विकृत मनोवस्थेचा बनला आहे. अर्थात सगळीच माणसं तशी नसतात. खूपशी माणसं चांगल्या विचारांची आहेत. सज्जन प्रवृत्तीची आहेत. तेही याच धरतीवर आहेत. पण जे विपरीत भावनेचे लोक आहेत ते सर्वाधिक हानीकारक ठरत आहेत. माणसात ह्या लालसा, स्वार्थभावना किती प्रबळ होत आहेत. जशा समुद्रात लाटा उसळतात तशा लोभ, लालसा, तृष्णा इ. भावभावनांच्या लाटा मानवी मनात सतत उसळतच असतात. एका शायरनं सुंदर प्रकारे म्हटलय -

'ये अजीबसा रिश्ता है मेरा
और ख्वाईशों के दरम्यान,
वो मुझे जिने नही देती,
मै उन्हें मरने नही देता।'

या इच्छा मला जगू देत नाही. एक इच्छा निर्माण झाली की, ती दाबून टाकतो,तेवढ्यात दुसरी उठते. ती दाबून टाकली की तिसरी इच्छा निर्माण होते. अशा या इच्छा मला जगू देत नाहीत आणि मी मात्र त्यांना मरु देत नाही अशाच प्रकारे इथंही इच्छा आहेत. पण त्या पावन पवित्र इच्छा आहेत. त्या परमार्थावर आधारित आहेत, त्या सत्संगावर परोपकारावर आधारित आहेत. सेवेवर आधारित आहेत. अशा या इच्छा-कामना खरोखरच अभिनंदनीय आहेत. त्या जिवित राहणं गरजेचं आहे. त्या इच्छा कधी मारुही नयेत. जे जीवन अशा गुणांनी युक्त असतं ते जीवन आनंदाने भरलेलं असतं, परिपूर्ण असतं. ज्यामध्ये असे गुण नसतात ते जीवन भयाण आणि भकास वाटतं. त्यात रिकामपण जाणवतं. त्यात रितेपणा-फोलपणा जाणवू लागतो. इथं संत-महापुरुषांनी जसा हा संदेश दिला तशी त्यांनी ही जागृतीही केली की, हे मानवा! तू स्वत:ला असं घडव, स्वत:ला असं रुप दे की, तुझ्यासाठी ते भलाईचं कारण आणि साधन बनू शकेल. ईश्वराशी-परमात्म्याशी नातं जोडल्याशिवाय धैर्य, संतोष-समाधान प्राप्त होत नाही. निस्वार्थभाव निर्माण होत नाहीत. उच्च गुणांनी युक्त जीवन बनत नाही.

❑❑❑




बाळू काका - विन्या, दोन मुलं आपसात हाणामारी करत असतील तर आपण काय केलं पाहिजे ?
विन्या - आपण खाली बसून घ्यावे... म्हणजे मागच्यांना पण दिसेल.

बन्या एका ऑफिसमध्ये इंटरव्हयूसाठी गेला होता
मॅनेजर - तुला मायक्रोसॉफ्टबद्दल काही माहीत आहे का ? त्याचा अर्थ वगैरे...
बन्या - हो, मायक्रोसॉफ्ट म्हणजे 'माझा कावळा मऊ' असा त्याचा अर्थ आहे.
मॅनेजर - बरं, जावा व्हर्जनबद्दल काही माहिती ?
बन्या - हो आहे ना, जावाचे चार प्रकार आहेत, मर जावा, मिट जावा, लुट जावा, सदके जावा.
मॅनेजर - तर मग आता सरळ घरी जावा

ठमाकाकू - सुमे अभ्यासाला बैस ! तू जर बारावीला नापास झाली ना, तर तुझं लग्न या दारुड्याशीच लावून देईन !
दारुडा - मावशी, बारावीचा रिझल्ट कधी आहे ?
ठमाकाकू - मेल्या तुला काय करायचय रे ?
दारुडा - नाही, म्हणजे....तुम्ही लग्नाचं काय ते बोलत होतात ना म्हणून विचारलं !

मुख्याध्यापक - विद्यार्थ्यांनो आपल्या शाळेच्या परीक्षेचा दहावीचा निकाल लागला त्यात दोन मुलींना नव्याण्णव टक्के मार्क मिळाले. मला सांगायला अभिमान वाटतो, की एकीचे वडील रिक्शा ड्रायव्हर आहेत तर दुसरीचे वडील वॉचमन आहेत.
बनी - मने, खरंच गं, आपलेही वडील रिक्शा ड्रायव्हर आणि वॉचमन असते तर किती बरं झालं असतं.

सुमी - डॉक्टर, माझं डोकं खूप दुखतय
डॉक्टर - मग सिटी स्कॅन करावं लागेल
सुमी - पण डॉक्टर, माझ्या एकटीच्या डोकेदुखीसाठी सगळी सिटी स्कॅन करायची काय गरज आहे ?






पाहुणे - (गण्याला) काय गणोबा, आता पुढे काय करायचं ठरवलंस
गण्या - काय नाय, तुम्ही गेले, की जेवायला बसणार.

सरिता वहिनी - अहो काकू, आपल्या शेजारचे कोमात गेले म्हणे!
मैना काकू - त्यांचं काय बाई, ते पैसेवाले लोक आहेत. कुठंही जातील.

आजोबा - आजही घुंगरांचे आवाज ऐकले, की पाय आपोआप तिकडे वळतात.
आजी - कुणीकडे ?
अजोबा - रसवंती गृहाकडे... उसाचा रस प्यायला!

कॉलेजच्या प्रवेशासाठी रांगेत एक सुंदर तरुण उभा होता. दोन-तीन कॉलेज तरुण त्याच्याकडे येत म्हणाले-"काय मित्रा, नवीनच दिसतोय. कोणत्या वर्षाला ॲडमिशन घेतोस ?"
तरुण - छोकऱ्यासाठी ॲडमिशन घ्यायला आलो होतो.
कॉलेज तरुण - (आश्चर्याने) म्हणजे तुम्ही पण....
तरुण - संतुर-बिंतुर काही नाही, माझ्या लहान भावाला आम्ही छोकरा म्हणतो.

एस्.टी. ने प्रवास करणारी आजी कंडक्टरला रोज भिजलेले काजू-बदाम देत असे. एकदा ...
कंडक्टर - आजी तू मला रोज रोज भिजलेले काजू-बदाम का देतेस ?
आजी - अरे बाबा माझ्या तोंडात दात नाहीत त्यामुळे नुसते चोखून फेकून द्यायचा जीव होत नाही रे!



समर्थ दर्शन : भाग - ५५

# घोड्याला जीवदान

वडगावला रात्री खूप उशीर झाला. तेव्हा जयराम स्वामी समर्थांना म्हणाले, "अद्याप रंगनाथ का येत नाही ?"

समर्थ म्हणाले, "तो सेवाधिकारी आहे. आल्यावाचून राहाणार नाही." इतके भाषण चालले आहे तोच घोड्याचे खिंकाळणे ऐकू आले. तेव्हा समर्थ म्हणाले, "आला रंगोबा आला." रंगनाथस्वामींची स्वारी चोरांच्या लटांबरासह येऊन दाखल झाली. आगत स्वागत झाल्यावर समर्थांनी विचारले, "अरे रंगोबा, ही मंडळी कोण ?" त्यावर रंगनाथांनी चोरांची हकीकत सांगितली. ती ऐकून समर्थांना हसू आले. नंतर रंगनाथस्वामींचे मंगलस्नान वगैरे होऊन आनंदमूर्तींसह पंचायतनाची भोजने झाली. गोपाळस्वामींना आज्ञा झाल्याप्रमाणे गोपाळस्वामींनी रंगनाथांचा घोडा नेऊन बागेत बांधला.

रात्री रंगनाथस्वामींना समर्थांनी कीर्तन करायला सांगितले. त्याप्रमाणे रात्रभर कीर्तन झाले. सर्व मंडळी ब्रह्मानंदात निमग्न होती. आरती व खिरापत होईपर्यंत उजाडले. इतक्यात गोपाळ गोसावी येऊन सांगू लागले, "रंगनाथस्वामींचा घोडा पागेत नेऊन लगाम सोडताच खाली पडला आणि मरण पावला. ही बातमी रात्रीच सांगावी तर कीर्तनाचा विरस होईल म्हणून आता आपल्या कानावर घातली आहे."

हे ऐकून समर्थ म्हणाले, "घोडा सरकार-सेवेत कमी आला याकरिता रंगोबाला सरकारातून नवा घोडा दिला पाहिजे." जयरामस्वामी म्हणाले, "घोडा देणं वडिलांचं काम आहे. ते ज्याचं त्यांनी करावं."

ह्याप्रमाणे थोडं विनोदपर बोलणं झाल्यावर समर्थ सर्व मंडळींना घेऊन पागेत गेले. पाहतात तो घोडा पाय पसरुन प्रेत होऊन पडला आहे. हे पाहून समर्थ जयरामस्वामींना म्हणाले, "जयरामा, घोड्याला उठव."

"आज्ञा प्रमाण." असे म्हणून जयरामस्वामी उठले आणि घोडयाला पुठ्ठ्यावर तीन वेळा थाप मारुन म्हणाले, "बाप्पा, ऊठ. समर्थांची आज्ञा आहे. ती अमान्य करु नका." असे म्हणताच घोडा फुर्र करुन खाडकन उभा राहिला. नंतर समर्थही

(पान ३६ वर)



# सिंहाला अद्दल घडली

मधुबन नावाचं जंगल होतं. तिथे एक सिंह राहात असे. तो फार आळशी आणि धूर्त होता. इतर पशूंनी स्वत:साठी करुन आणलेल्या शिकारी हाच बहाद्दर फस्त करायचा. त्याच्या दहशतीमुळे असहाय निर्बल जनावर नुसतं पहात बसण्याशिवाय काहीच करु शकत नव्हते.

जंगलातील सर्व पशु त्याला 'दादा' म्हणायचे. जंगलातील इतर पशूंबरोबर तो मैत्री करायचा. कुणी हल्ला केलाच तर त्याचं रक्षण करण्याची जबाबदारी घेण्याची आश्वासनं द्यायचा. त्यामुळेच जंगलातील कमजोर लहान लहान जनावरं काही आश्वासनामुळे तर काही भीतीपोटी त्याचा विरोधही करु शकत नव्हते. कधी कधी शिकार मिळाली नाही तर या मित्रांनाही फस्त करुन टाकायचा. त्याच्या या वागण्याने जंगलातील सगळी जनावरं त्रस्त होती.

एके दिवशी जंगलातील जनावरांनी समुद्राच्या मधोमध असलेल्या बेटावर सहल नेण्याची योजना आखली. पण या योजनेची खबर सिंहदादाला कशी लागली कुणार ठाऊक! सिंहदादानेही त्यांच्याबरोबर येण्याची इच्छा प्रगट केली. त्याच्या इच्छेला विरोध करण्याची हिंमत कोणात नव्हती. दुसऱ्या दिवशी सिंहदादाबरोबर पिकनिकला माकड, अस्वल, लांडगा,

रानडुक्कर इ. यायला तयार झाले. सिंहदादाबरोबर नावेत बसायला कोणीच धजेना म्हणून माकडाच्या सल्ल्याने सिंहदादासाठी वेगळ्या नावेची सोय करण्यात आली. त्या नावेची दोरी इतर जनावरांना नेणाऱ्या नावेला बांधण्यात आली. सगळी जनावरं नाचत बागडत हळूहळू त्या बेटाकडं निघाली.

सिंहदादाला या सहलीत रस नव्हता. तो एवढ्याचसाठी आला होता की, यातलं एखादं जनावर एकटं सापडलच तर फस्त करायचं! फस्त केलं तरी कोणी संशय घेणारही नाही. कोणी घेतलाच संशय तर सांगता येईल की, टापू नवा आहे. भटकलं असेल इकडंच कुठतरी. ताजी तवानी रानडुकरं पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटायचं. रानडुकरांवर त्याचा बऱ्याच दिवसापासून डोळा होता. त्यांच्यावर हल्ला करुन डल्ला मारता येईल असा एकांतच त्याला मिळाला नव्हता. नाव बेटावर पोहोचली. सगळी जनावरं उतरुन फिरु लागली. माकडाने सिंहदादाच्या नावेला बांधलेली दोरी सोडली आणि आपली नाव एका काठाला लावली व बांधून टाकली. सिंहदादा त्याच्या नावेत बसल्या बसल्या पेंगत होते. सिंहदादा म्हणाले, "तुम्ही लोक जा, फिरा, मौज करा. मला झोप येतेय. मी नावेतच झोपतोय. परत जाताना मला जागवा."

माकड बेटावरच्या उंच झाडावर चढून उड्या मारु लागलं. माकडाच्या लक्षात आलं की सिंहाला झोप आलेली नाही. नाटकच आहे. केव्हा एखादं जनावर त्याच्याकडे येतं नि त्याला फस्त करायची संधी कशी मिळते याची सिंहदादा वाट पाहतोय. त्यामुळे झाडाझाडावरुन उड्या मारत माकड इतर प्राण्यात जाऊन मिसळलं.

सिंहदादा नावेत पेंगता पेंगता झोपी गेला. समुद्रात लाटा उसळत होत्या, सिंहदादाची नाव बांधायची राहून गेली होती. लाटांबरोबर नावही मागेपुढे होत होती. नाव काठापासून बरीच दूर आलेली पाहून सिंहदादा घाबरले. नावेत लाटांचे भरपूर पाणी शिरु लागले होते. सिंहदादाच्या हालचालीनं नाव कधी इकडे तर कधी तिकडे झुकू लागली. सिंहदादा बचावासाठी गर्जना करु लागला. पण तिथं कोणीच नव्हतं.

संध्याकाळी सगळ्या जनावरांना बरोबर घेऊन माकड काठावर आलं. तिथं सिंहदादाची नाव गायब झालेली पाहून आश्चर्य वाटलं. सगळे त्याला शोधू लागले. तेवढ्यात सिंहदादाचं फुगलेलं शरीर लाटांनी काठावर आलं. सर्वांनी सिंहाला मेलेलं पाहिलं आणि एकच जल्लोष केला. सिंहाच्या अत्याचारापासून सर्वांची सुटका झाली. सिंहाला त्याच्या धूर्तपणाची चांगली अद्दल घडली.

❑❑❑

# घोड्याला जीवदान

(पान ३४ वरुन)

जवळ जाऊन त्याची पाठ थोपटून म्हणाले, "बाप्पा, तुझी नेमणूक रंगोबाच्या सेवेकरिता केली आहे. ह्याकरिता त्याची सेवा पुरी करावी. मध्यंतरी मरु नये." हा अद्भुत प्रकार पाहायला शेकडो मंडळी जमली होती. त्यांनी धन्य धन्य म्हणून जयजयकार केला. इतकेच नव्हे तर तिन्ही स्वामींनी एक एक समर्थांच्या वर्णनपर श्लोक रचला त्यांना उत्तर म्हणून समर्थांनी चौथा श्लोक रचला नंतर चोरांना आशीर्वाद व प्रसाद देऊन सज्जन केले व "पुन्हा चोरी करु नका" असा उपदेश करुन निरोप दिला. तेव्हा ते सर्वजण आपली हत्यारे स्वामींच्या चरणी अर्पण करुन निघून गेले. नंतर चार दिवस आनंदाने ब्रह्म-चर्चा करुन सर्व मंडळी आपापल्या स्थानी निघून गेली.

क्रमशः

❑❑❑

# तिजनबाई (लोककलाराणी)




अवघ्या बाराव्या वर्षी लग्न लागलेल्या तिजनबाई केवळ गातात आणि हातात एकतारी घेतात, यासाठी गावात बहिष्कृत झाल्या. तरी त्यांनी गाणे सोडले नाही. स्वतःच झोपडी बांधली. उपवास काढले. भांडीकुंडी मागून रांधले पण साधना चालू ठेवली. आज 'पंडवानी' या लोककला प्रकाराच्या त्या जगविख्यात राणी आहेत. पंडवानी म्हणजे पांडवांचे आख्यान. या छत्तीसगढ़ी लोककलेत फक्त एकतारीची साथ घेत घेत महाभारताचे गानआख्यान लावले जाते. खेळत्या वयात आजोबांकडून पंडवानी ऐकलेल्या तिजनबाईंनी हाच ध्यास घेतला. मात्र तोवर पंडवानी केवळ पुरुषच गात-साकारत. तिजनबाई या पहिल्या महिला कलावंती. जसे कळले तसे पंडवानी त्यांनी तेराव्या वर्षीच सादर केले. काही वर्षांनी विख्यात रंगकर्मी हबीब तन्वीर तिजनबाईंची विलक्षण अदाकारी पाहून चकित झाले. मग तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांना खास बोलावून घेतले. त्यानंतर तिजनबाईंनी जगभर पंडवानीचे नाव पोहोचवले. तिजनबाई मंचावर येतात तेव्हा कथेच्या ओघात त्यांची एकतारीच कधी गदा बनते तर कधी रथ. कधी अर्जुनाचा बाण तर कधी शंख. त्या स्वतः जणू परकायाप्रवेश करतात आणि द्रौपदी, अर्जून, भीम, भीष्म बनतात. महाभारत हे विशाल महाकाव्य असले तरी द्रौपदी चीरहरण, भीष्म-अर्जुन युध्द, दुःशासन वध... हे प्रसंग साकारण्यात तिजनबाईंचा हातखंडा होता. छत्तीसगढी पारधी समाजाने जपलेली ही लोककला तिजनबाईंमुळे देशाला कळली. १९५६ मध्ये जन्मलेल्या तिजनबाई १९८८मध्ये 'पद्मश्री' झाल्या. त्यानंतर, संगीत नाटक अकादमी, पद्मभूषण या शिवाय इतर शेकडो पुरस्कार चालत आले. नुकताच त्यांना जाहीर झालेला 'पद्मविभूषण' हा पुरस्कार तर सगळ्यांच लोककलांसाठी अभिमानाचा आहे. स्वातंत्र्यानंतर लोककलांचे जे नवसर्जन झाले, त्याच्या अग्रदूत म्हणून तिजनबाईंचे नाव कलेतिहासात सुवर्णाक्षरांत लिहिले गेलेच आहे. आता त्यांच्या अलौकिक कर्तबगारीचा पुन्हा एकदा सार्थ गौरव झाला.

❑❑❑



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा








मौली, किट्टी, पाहा मी तर वरच्या फांदीच्या टोकावर पोचलो, इथून उडी घेऊन आरामात खाली येऊ शकतो.
वाऽऽ चिंटू... फारच सुंदर.
आता मोंटूची पाळी मी तर सर्वांच्या मागून सर्वांपेक्षा उंचावर चढून दाखवीन आणि पहिला नंबर घेईन.
अरे वा, मोंटू, तुझ्यापेक्षा उंचीवर किट्टी सुध्दा जाऊ शकत नाही. बिचारी किट्टी! हा...हा...हा...


पाहा मौली, मोंटू चिंटू तुम्हीसुध्दा पाहा, मी सांगितलं होतंना, मीच विजयी होणार म्हणून. या... हु...उ..
अरे वा! फारच छान, किट्टी तू तर कमालच केलीस. खरोखरच तू शूर आहेस.
आई गं! माझा पाय... झाडावरुन पडल्याने माझ्या पायाला मार लागला. कुणी तरी आईला बोलवा, मी उभी राहू शकत नाही.


किट्टी बाळा काय झालं ? मी तुला सांगितलं होत ना की, जास्त आगाऊपणा करु नकोस म्हणून; पाहिलंस न ऐकण्याचा परिणाम.
किट्टी बाळा, हा ज्युस घे. तुला कितीवेळा सांगितलं की, जास्त मस्ती करत जाऊ नकोस. म्हणून बघ लागला ना मार!
क्षमा कर आई यापुढे ध्यानात ठेवीन आणि तू जे सांगशील ते ऐकेन

# चीनमध्ये दहाव्या शतकापासून पंख्याचा वापर



सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे उन्हाळा आणि डोक्यावर पंखा हे समीकरणच आहे. पंख्याची सुरुवात सर्वप्रथम जपानमध्ये झाली. सातव्या शतकात अशा पंख्यांची निर्मिती होत असे; ज्यावर कुटुंबाचा इतिहास लिहिला जात असे.

जपानी लोकांचा असा समज आहे की, स्वर्गामध्ये पंखाच्या कलेचा उल्लेख आहे. जो पंखा तयार करण्याच्या कलेत हुशार असेल त्याला स्वर्गात चांगले स्थान मिळते.

चीनमध्ये दहाव्या शतकामध्ये पंख्याचा उपयोग व्हायला सुरुवात झाली. चीननंतर युरोपमध्ये पंख्याचे प्रचलन झाले. वास्को-दी-गामाने विविध प्रकारचे पंखे तयार केले. तारेने जोडलेले पंखे उघडल्यानंतर वटवाघळाच्या पंखाप्रमाणे वाटायचे. काही काळानंतर पेईकिंगच्या महालामध्ये हत्तीच्या दातांचे पंखे तयार होऊ लागले. चीन हे पंख्यांच्या उत्पादनाचे केंद्र बनले. पंख्यांवर सुंदर चित्रे काढण्यात आली. सोनारांनी सोन्या-चांदीच्या तारांनी पंख्यांना मढविले. चीनमध्ये एखाद्या माणसाची ओळख पंख्याद्वारे होऊ लागली. ज्या देशाचा पंखा चांगला त्या देशाची प्रतिष्ठा चांगली होती.

प्राचीन काळामध्ये इजिप्त आणि भारतामध्ये वातावरण थंड वाटावे म्हणून पंखे आणले गेले. इजिप्तामध्ये पंख्यांनी राजकीय कार्याचा समारोप केला जात असे. राजा ज्या कुणाच्या दुसऱ्याच्या ज्या पंख्याचा स्वीकार करत असे त्याची प्रतिष्ठा खूप वाढत. असे खोलीमध्ये अडकवलेल्या पंख्यांची देखभाल दास-दासी करीत असत.



मध्यकाळात ख्रिश्चन लोकांनी धार्मिक कार्यक्रमामध्ये पंख्याचा उपयोग केल्याचे आढळते. चांदीचे पंखे पादरी लोक आपल्या हातात ठेवत असत. मूर्त्या पंख्यांनी स्वच्छ केल्या जात असत.

पाश्चिमात्य देशात सामान्य लोक चामड्याचे पंखे वापरत होते. सोळाव्या शतकाच्या अखेरीस पूर्वेकडच्या देशांबरोबरच भारतात पंखे हत्तीच्या दातांचे तयार करीत असत. त्यांची आकृती झेंड्यासारखी असे. आजच्या काळामध्ये ताडापासून तयार केलेला पंखा खूप उपयोगी आहे. वीज संकटामुळे हातातला पंखा अनिवार्य आहे. रेल्वे, बस, सिनेमागृहात हातातला पंखा वापरला जातो. ताडाच्या झाडाच्या फांदीपासून तयार केलेल्या पंख्याची हवा चांगली लागते. बांबुच्या पोकळीपासूनही पंखे तयार होतात. तसेच आधुनिक युगात प्लॅस्टिकपासूनही तयार केलेले आकर्षक पंखे बाजारात उपलब्ध आहेत.

- साभार

# सकारात्मक जगण्यासाठीच्या काही साध्या सोप्या सवयी :

- कायम चेहऱ्यावर हास्य ठेवा.
- रोज सकाळी किमान पंधरा मिनिटे सूर्यप्रकाशात थांबा.
- तुमच्या आसपास प्रेमळ आणि सकारात्मक विचारांच्या व्यक्ती राहतील याची काळजी घ्या. अगदी ऑनलाईनदेखील सकारात्मक विचारांच्याच लोकांशी संवाद साधा.
- अंतर्मनाने भगवंतांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा.
- तुम्हाला काही तरी नवीन शिकवणारे, प्रेरणा देणारे वाचा.
- दिवसभर कुठल्या ना कुठल्या कामात रहा.
- तुम्हाला आनंद मिळेल असे काही तरी दिवसभरात करा.
- सकाळी उठल्यावर आरशात पहा आणि स्वत:लाच शुभेच्छा द्या.
- भरपूर हसा.
- गरजूंना मदत करा.
- चिंता झटकून टाका.
- चांगली स्वप्ने पहा.
- अस्वस्थ गोष्टींतून स्वस्थता मिळवण्याचे कौशल्य आत्मसात करा.
- तुम्ही ज्या काही चांगल्या गोष्टी केल्या आहेत त्या कायम स्मरणात ठेवा. त्याची उजळणी करत राहा.
- तुम्हाला आनंद मिळवून देणाऱ्या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करा.
- पुरेशी झोप घ्या. गरज वाटेल तेव्हा एखादी डुलकी घ्या.
- नियमित व्यायाम करा.
- स्वत:वर विश्वास ठेवा.
- पाळीव प्राण्यांशी खेळा.
- उद्दिष्ट साध्य करा आणि नवीन उद्दिष्ट साध्य करण्याच्या कामाला लागा.
- मूल्ये विसरु नका.
- लक्ष केंद्रीत करा, केंद्रीत करा आणि केंद्रीत करा.
- संगीत ऐका किंवा तुमची आवडती गाणी गुणगुणा.
- जुन्या चांगल्या आठवणींना उजाळा द्या.
- नवीन काहीतरी शिका.
- स्वत:वर भरपूर प्रेम करा.
- डोळे मिटा आणि तुमची स्वप्ने आणि ध्येय शांतपणे पहा.
- लोकांचे मनापासून कौतुक करा.
- घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल यासाठी प्रयत्न करा.
- उत्साही रहा, चेष्टामस्करी करा.
- आव्हानांना सामोरे जा. जोखीम उचला.
- योग करा.
- स्वत:च्या महत्त्वाकांक्षांना महत्त्व द्या, रोज त्यावर थोडेतरी काम करा.
- तुमच्या कष्टांचे तुम्ही सकारात्मक पध्दतीने कौतुक करा.

– साभार





महड



पाली



# रायगड

**रायगड - जनगणना - २००१**

**एकूण लोकसंख्या - २२,०५,९७२**

**पुरुष-महिला प्रमाण - १०००-९७५**

**एकूण साक्षरता - ७७.३२**

**पुरुष साक्षरता - ८६.४०**

**स्त्री साक्षरता - ६८.०६**



कुलाबा किल्ला

मुख्यालय - अलिबाग

क्षेत्रफळ - ७,१४८ चौ.कि.मी.

तालुके - अलिबाग, मुरुड, पेन, पनवेल, उरण, माणगांव, कर्जत, महाड, तळा, खालापूर, रोहा, पोलादपूर, सुधागड, पाली - (१५)

नद्या - उल्हास, पाताळगंगा, अंबा, कुंडलिक, सावित्री, घोड, काळ, पेज.

खनिजे - बॉक्साईट, किनाऱ्यालगतचे मीठाचे उत्पादन

प्रमुखशेतकी उत्पादने - तांदूळ मुख्य पीक, नाचणी, वरी, आंबा, काजू, नारळ, सुपारी.

धरणे - राजनाला (कर्जत), कोलाड (काळ प्रकल्प)


थंड हवेचे ठिकाण - माथेरान

विशेष माहिती -

- ★ रायगड जिल्ह्याचे नाव पूर्वी कुलाबा असे होते.
- ★ महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी पाली व महड (मढ) येथील गणेशाची स्थाने याच जिल्ह्यात आहेत.
- ★ रायगड, मुरुड-जंजिरा, कुलाबा, सरसगड इ. किल्ले याच जिल्ह्यात आहेत.
- ★ सव, कन्हेरे या ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत.
- ★ रायगड जिल्ह्याच्या पूर्वेकडील अंतर्गत भागात


रायगड किल्ला


सरसगड किल्ला


घारापुरी लेणी

कातकरी व ठाकर या आदिवासी जमाती आढळतात.

★ रायगड जिल्ह्याचे अलिबाग हे मुख्य ठिकाण पूर्वी मराठ्यांचे आरमारप्रमुख आंग्रे यांच्या राजधानीचे ठिकाण होते.

★ रायगड जिल्हातील घारापुरी लेणी प्रसिध्द आहेत.

★ महाराष्ट्रातील पहिले पक्षी अभयारण्य कर्नाळा व पहिले जलविद्युत केंद्र खोपोली हे रायगड जिल्ह्यात आहेत.


★ लोणेर येथे डॉ. आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ आहे.

★ गागोदे - आचार्य विनोबा भावे यांचे जन्मस्थान.

★ शिरढोण आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मस्थान.

रायगड हा जिल्हा असला तरी रायगड नावाचं कुठलंही गाव या जिल्ह्यात नाही.

❒❒❒


मुरुड-जंजिरा



# सामान्य ज्ञान



१) १ मे १९८१ या दिवशी कोणत्या जिल्ह्याची निर्मिती झाली ?

अ) नंदुरबार ब) वाशिम क) सिंधुदुर्ग ड) पालघर

२) मे महिन्याचा पहिला रविवार हा कोणता दिवस म्हणून साजरा करतात ?

अ) मातृदिन ब) पितृदिन क) हास्यदिन ड) पर्यटनदिन

३) १४ मे १६५७ रोजी पुरंदर गडावर कोणाचा जन्म झाला ?

अ) छ. संभाजी महा. ब) छ. राजाराम महा. क) छ. शाहू महा. ड) छ. शिवाजी महाराज

४) स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

अ) महू ब) जांब क) श्रीवर्धन ड) भगूर

५) मराठ्यांना जिंकता न आलेला सागरी किल्ला कोणता ?

अ) मुरुड-जंजिरा ब) सिंधुदुर्ग क) सुवर्णदुर्ग ड) विजयदुर्ग

६) महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असे कोणत्या नदीस म्हटले जाते ?

अ) गोदावरी ब) कोयना क) पूर्णा ड) भीमा

७) सज्जनगडावर कोणत्या संताने समाधी घेतली ?

अ) संत नामदेव ब) संत तुकाराम क) समर्थ रामदास ड) संत एकनाथ

८) खालीलपैकी कोणती व्यक्तिरेखा रामायणातील नाही ?

अ) मंथरा ब) शिखंडी क) तारा ड) मंदोदरी

उत्तरे इतरत्र

९) संत कबीर यांचे गुरु कोण होते ?

अ) रामदास स्वामी ब) खेचर स्वामी क) चैतन्य स्वामी ड) रामानंद स्वामी

१०) 'भिंतीरहीत जग' हा संदेश देणारी महान विभूती कोण ?

अ) बाबा सज्जनसिंहजी ब) बाबा हरदेवसिंहजी क) बाबा बूटासिंहजी ड) माता सविंदरजी

# लाजाळू सोनेरी तितर



हा प्रामुख्याने चीनमध्ये आढळणारा सुंदर पक्षी आहे. याला इंग्रजीत 'गोल्डन पिजंट' म्हणतात. युरोप, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये त्याचं वास्तव्य दिसून येतं. भारतात हा पक्षी क्वचितच आढळतो. साधारण ९० ते १०५ सेंटीमीटर लांबीचा हा पक्षी कमी वजनाचा असतो. याचं वैशिट्य म्हणजे साधारण याच्या शरीराच्या निम्मा आकाराएवढी याची शेपटी असते. नारिंगी-पिवळ्या रंगाच्या या पक्ष्याच्या शरीरावर सोनेरी रंगाची उधळण असते. मानेवर तपकिरी रंगाच्या आडव्या रेषा असतात व पंखांच्या टोकाकडील भागावर तपकिरी-पांढऱ्या रंगाची पिसं असतात. नर व मादी दिसायला सारखे असले, तरी नर हा मादीपेक्षा जास्त उठावदार रंगाचा व चमकदार असतो. यामानाने मादी फिकट रंगाची असते. याची चोच आणि पाय पिवळसर रंगाचे असतात. हा तितर फार उंचावरुन उडू शकत नाही. फार क्वचित म्हणजे काही धोका दिसला, तरच हा वरील दिशेला उड्डाण करतो. विशेषत: जमिनीवर राहणंच हा पसंत करतो. 'चॅक चॅक' असा आवाज करणारा हा पक्षी फार लाजाळू असतो.

फार कमी वेळा दृष्टीस पडणारा हा सुबक आकाराचा पक्षी दाट झाडाझुडपांचा प्रदेश, जंगल, फळबागा या भागात आढळतो. तसंच मनुष्यवस्तीतदेखील याचं वास्तव्य दिसून येतं. बारीक किडे, अळ्या, गांडुळ, सरडे, फळ आणि गवताचे दाणे हे याचं प्रमुख खाद्य आहे.

फांदीच्या बेचक्यात अथवा झाडाझुडपांत हा गवत, काड्या, झाडाची पानं, शेवाळे इत्यादी साहित्य वापरुन घरटं तयार करतो. यात मादी एका वेळी आठ ते दहा अंडी घालते. ही अंडी २२-२३ दिवस उबवल्यानंतर पिल्लं बाहेर येतात व १२ ते १४ दिवसांनी ही पिल्लं उडण्यास सक्षम होतात. या पक्ष्याच्या अनेक प्रजाती संकरित केल्या असून, या विविधरंगी प्रजाती अनेक देशांत पाळल्या जातात.

❑❑❑



कथा

# खरा भक्त

एकदा आषाढी एकादशीला पंढरपूर माणसांनी भरुन गेलं होतं. ठिकठिकाणाहून भक्त पालख्या घेऊन दिंडी घेऊन नाचत होते. भजन म्हणत विठ्ठल विठ्ठल नामघोष करीत, टाळ वीणा वाजवीत चालत होते. चंद्रभागेत स्नान करुन विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवण्यास प्रत्येकाची नुसती धडपड चालली होती.

ते सर्व पाहून रुक्मिणी विठ्ठलाला म्हणाली, "काय तुमचं भाग्य, किती भक्त लोक तुमच्या दर्शनासाठी जमले आहेत; पण तुम्ही त्या सर्वांना दर्शन देणार आहात का ?"

त्यावर विठ्ठल म्हणाले, "रुक्मिणी, या सर्व

गर्दीमध्ये कुणीतरी एखादाच माझ्या दर्शनासाठी आलेला असेल. बाकी सारे काही ना काही मागण्यासाठी किंवा पुण्य मिळावं म्हणून आलेले आहेत. जो केवळ माझ्या प्रेमापोटी, माझ्या दर्शनाच्या ओढीने आलेला असेल त्याला माझे दर्शन घडेल.''

रुक्मिणी म्हणाली, ''अहो पण असा भक्त ओळखायचा कसा?''

विठ्ठल म्हणाले, ''तू कुंभारीण बन, मी गाढव बनतो. मी तहानेनं तडफडत पडतो. तू प्रत्येकाकडे गाढवाला पाणी पाजण्यासाठी विनवणी कर. जो खरा भक्त असेल तो पाणी पाजायला पुढे येईल.''

ठरल्याप्रमाणे चंद्रभागेच्या वाळवंटात गाढव पाण्याविना तडफडत होते. कुंभारीण रडवेली होऊन पाण्यासाठी विनवण्या करु लागली. पण जो-तो चंद्रभागेत स्नान करुन आल्याने गाढवाचा आणि कुंभारीणीचा स्पर्शही होऊ नये म्हणून दुरुनच जात होते. कोणी त्यांना रागावत, वाईट-साईट बोलत निघून जात होते; परंतु त्या गर्दीत एक सज्जन वाट काढत पुढे आला. चंद्रभागेतून पाण्याने भरलेली घागर त्याने देवाच्या अभिषेकासाठी घेतली होती, पण घागरीतील पाणी त्याने गाढवाला पाजले. कुंभारीणलाही पाणी दिले. तिची विचारपूस करुन आपल्या सोबत आणलेली भाकरी-चटणी खायला दिली.


तेवढ्यात गाढवातून एक सुंदर साजिरी तेजस्वी मूर्ती प्रकटली, शेजारी कुंभारीण होती; पण तीही तेजस्वी मूर्ती. सुहास्य वदन. हात कटेवर. त्या सज्जनाला आशीर्वाद देऊन दोघेही अदृश्य झाले. त्या सज्जनाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. आता मंदिरात जाण्याची गरज नव्हती. ज्याच्यासाठी तो आतुर झाला होता ते साजरे रुप त्याला प्रत्यक्ष साकार रुपात दर्शन देऊन अंतर्धान पावलं होतं. आता दगडाच्या मूर्तीपुढे डोकं आपटण्याचा सोपस्कार कशासाठी?



मित्रांनो, प्रत्येक प्राणिमात्रात विठ्ठलाला पाहणारा तो सज्जन कोण होता?... ते होते संतश्रेष्ठ एकनाथ महाराज! त्यांनी जात-पात, स्त्री-पुरुष, उच्च-नीच असा भेद कधीही केला नाही.

❑❑❑

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) क
३) अ
४) ड
५) अ
६) ब
७) क
८) ब
९) ड
१०) ब

## शब्दकोडे

९७८

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ मु | | २ ए | ३ क | दं | ४ त | |
| ५ म | ध्य | | ला | | ६ ट | न |
| ता | | ७ का | म | गा | र | |
| ८ ज | ९ पा | न | | | १० क्ष | मा |
| | ळी | | ११ जा | १२ त | क | |
| १३ य | व | १४ त | मा | ळ | | १५ के |
| शो | | बे | | १६ हा | र्ब | र |
| १७ दा | दा | ला | | त | | ळ |

।। १ तू ही निरंकार ।।

कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।
कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।
कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।
कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

**सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है**
**पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है**

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

